MHLA020027022022

## नियमित दिवाणी दावा क्र.४०९/२०२२ मधील नि.क्र.११२ वरील आदेश

(सुभद्राबाई वि. पार्वतीबाई व इतर)

प्रतिवादी क्र.५५ यांनी प्रस्तुतचा अर्ज हा लेखी म्हणणे स्विकारण्याकरीता दाखल केला आहे.

२. अर्ज व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले. त्याचप्रमाणे दोन्ही बाजुचा युक्तीवाद विचारात घेतला. प्रतिवादी क्र.५५ याचे असे कथन आहे की, आवश्यक ते कागदपत्रे उपलब्ध न झाल्यामुळे प्रतिवादी क्र.५५ हा मुदतीत लेखी कैफियत दाखल करु शकले नाहीत. त्यामुळे प्रतिवादी क्र.५५ याची लेखी कैफियत स्वीकारण्यात यावी. कैफियत स्वीकारली नाहीतर प्रतिवादीचे कशानेही न भरुन येणारे नुकसान होणार आहे. याउलट, वादीने प्रतिवादीचा प्रस्तुत अर्ज दंड भरुन मंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रस्तुत दावा मालकी घोषीत करुन ताबा मिळणेसाठी दाखल केला असल्याचे दिसून येते. अर्जातील कारणे व दाव्याचे स्वरुप विचारात घेता सदर प्रतिवादी क्र.५५ यास त्याची लेखी कैफियत दाखल करण्याची संधी देणे योग्य व संयुक्तीक आहे. त्यामुळे खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

### आ दे श

अर्ज (नि.क्र.११२) मंजूर करण्यात येतो.

Digitally signed by JYOTI JAGANNATH MANE
Date: 2023.02.04 17:54:55 +0530

दि.०४/०२/२०२३ ( ज्योती जे. माने )
लातूर २रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, लातूर